# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ / श्रावण ९, १९४५ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) उप मुख्यमंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) गृहनिर्माण मंत्री**
**(५) बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### राज्यातील खाजगी व शासकीय आस्थापनांमधील महिला कर्मचारी तसेच विद्यार्थीनी यांना मासिक पाळीच्या कालावधीत विशेष रजेचा लाभ देण्याबाबत

**(१) * १९९७३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील महिला कामगार आणि विद्यार्थीनींसाठी मासिक पाळीच्या कालावधीतील रजेच्या संबंधातील जनहित याचिका विचारात घेण्यास नकार दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासिक पाळीच्या कालावधीत महिला कर्मचारी/कामगार व विद्यार्थीनींना रजा देण्याबाबत सद्य:स्थितीत बिहार व केरळ राज्यामध्ये तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्र राज्यात अद्याप अशी कोणतीच तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महिलांना होणारा शारिरीक व मानसिक त्रास लक्षात घेता, जगभरातील विविध देशांमध्ये या कालावधीत महिलांना विशेष रजा देण्यात येत असताना महाराष्ट्र राज्यात अशी तरतूद अद्याप न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी आस्थापनांमध्ये अशा रजेची मागणी केल्यास संबंधित महिला कर्मचारी / कामगाराची नोकरी जाण्याची शक्यता लक्षात घेता, दरमहा रजा देणे शक्य नसल्यास संबंधित महिला कर्मचाऱ्यांकडून इतर कामाच्या दिवशी वाढीव तासाचे काम करून वेतनासह सदरहू रजा महिलांना देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी व शासकीय आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या महिलांना मासिक पाळीच्या कालावधीतील रजेचा वेतनासह लाभ मिळावा यानुषंगाने कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, मासिक पाळीच्या कालावधीत महिला कर्मचारी/कामगार व विद्यार्थीनींना रजा देण्याबाबत बिहार व केरळ राज्यामध्ये तरतूद करण्यात आली असून त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी व शासकीय आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या महिलांना मासिक पाळीच्या कालावधीतील रजेचा वेतनासह लाभ मिळावा यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) मासिक पाळीच्या कालावधीत महिला कर्मचारी यांना रजा देण्यासंदर्भात सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्यात कोणतीच तरतूद करण्यात आलेली नाही.

(३) (१) केंद्र शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या कालावधीत पगारी रजा देण्याबाबतची कोणतीही तरतूद सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही.

(२) कामगार विभागाच्या अभिप्रायानुसार, सदर रजा अनुज्ञेय केल्यास, खाजगी/शासकीय आस्थापनांमध्ये अनेक वादविवाद उपस्थित होण्याची शक्यता उदभवू शकते.

(३) महाराष्ट्र राज्यातील महिला कर्मचाऱ्यांची वाढती संख्या विचारात घेता, मासिक पाळीची रजा अनुज्ञेय केल्यास खाजगी/प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

(४) मासिक पाळी ही अत्यंत वैयक्तिक व गोपनीय बाब आहे. सदर तरतूद लागू केल्यास कामाच्या ठिकाणी महिलांची हेटाळणी, अपमान, शाब्दिक विनयभंग होऊ शकतात. तसेच, महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम,२०१३ मधील तरतुदीचे उल्लंघन होऊन तक्रारी वाढण्याची शक्यता उद्भवु शकते.

वरील कारणे विचारात घेता, महाराष्ट्र राज्यात अशा प्रकारे विशेष रजा देण्याची तरतूद केलेली नाही.

(४), (५) व (६)

सदर बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## औरंगाबाद मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२) * १९९४८ श्री.अंबादास दानवे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करताना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक संचालनालयामार्फत (ईडी) चौकशी करण्यात आली असून ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्याप कोणावरही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिका तसेच गंगापूर, फुलंब्री, सोयगाव, माजलगाव, देवगड, राहता या नगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या निविदा व इतर कामात गैरप्रकार झाल्यावरून निविदा समितीतील सात सदस्यांविरूद्द कारवाई करण्याबाबत नगरविकास विभागाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका व इतर जिल्हाधिकारी यांना सन २०२२-२०२३ मध्ये आदेश दिले असून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सादर करण्यात आलेल्या निविदा एकाच संगणकावरुन सादर करण्यात आल्या असून यात समावेश असलेल्या प्रशासनातल्या दोषी अधिकाऱ्यांची राज्य गुप्तचर विभागामार्फत (एस आय टी मार्फत) चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गैरव्यवहार प्रकरणी गृहनिर्माण विभागामार्फत स्थापन केलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असल्यास त्यानुषंगाने संबंधितांवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर गुन्हा नोंद करुन त्यांना अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली तसेच जिल्ह्यातील ४०,००० गरजु लाभार्थ्यांना घरे मिळण्यासाठी पुर्ननिविदा प्रक्रिया राबवून पात्र लाभार्थ्यांना घरे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त, उपायुक्त महानगरपालिका व अन्य संबंधित अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांची आर्थिक संचालनायामार्फत (ईडी) साक्ष नोंदविण्यात आली. तथापि, कोणत्याही अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(२) औरंगाबाद महानगरपालिका तसेच इतर नगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या निविदा व इतर प्रकरणात झालेल्या गैरप्रकाराबाबत नगरविकास विभागाकडून निविदा समितीतील सात सदस्यांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. तथापि, महानगरपालिकेच्या स्तरावर तीन ठेकेदारांनी एकाच आयपी ॲड्रेस वरुन निविदा दाखल केल्याचे आढळून आले. त्यामुळे या कंपन्यांच्या एकूण १९ भागीदारांविरुध्द् निविदेतील अट क्र. १७.१७ मधील Restrictive Practices चा अवलंब केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्याने सर्व भागीदारांवर पोलीस स्टेशन सिटी चौक येथे गु.र. नं. ७९/२०२३ गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या व्यतिरिक्त मे. समरथ मल्टीबीज इंडिया प्रा.लि यांचा काळया यादीत समावेश करण्यात आला आहे.

(३) व (४) दिनांक ०५/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत औरंगाबाद येथील प्रकल्पांसाठी चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार कार्यवाही करणेबाबत आवश्यक त्या सूचना शासन स्तरावरून निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर निविदा प्रकरणी संबंधित कंपन्यांच्या सर्व १९ भागीदारांवर पोलीस स्टेशन सिटी चौक येथे गु.र. नं. ७९/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत नव्याने निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शैक्षणिक साहित्यांवर वस्तू व सेवा कर आकारल्यामुळे शैक्षणिक वस्तू महाग झाल्याबाबत

**(३) * १९४५७ श्री.सचिन अहिर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चालू वर्षी कागदासह शैक्षणिक साहित्यावर शासनाने १८ टक्के वस्तू व सेवा कर आकारल्यामुळे वहया, पुस्तके, पेन्सिल, पेन, दप्तर, नोटपॅड आदी शैक्षणिक वस्तू २० ते ५० टक्क्यांनी महाग झाल्याची बाब दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्तू व सेवा कर आकारला गेल्याने इयत्ता १ ली ते १० वी च्या पाठयपुस्तकांच्या किंमती ३० ते ३५ टक्क्यांनी वाढल्या असल्याने सदरील पाठयपुस्तकांच्या दरवाढीमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक भार सहन करावा लागणार असल्याने सदरील दरवाढ नियंत्रणात आणण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शैक्षणिक पुस्तके, वह्या व साहित्याच्या किंमती नियंत्रणात आणण्याबाबत तसेच शैक्षणिक साहित्यावर वस्तु व सेवा कर आकारण्याची कारणे काय आहेत व तो रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात शासनाने कागद, वहया, पुस्तके, पेन्सिल, पेन, दप्तर, नोटपॅड यांवरील वस्तु व सेवा करात कुठलीही वाढ केलेली नाही.

वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीपासूनच (१ जुलै २०१७ पासून) पाठयपुस्तके (करमुक्त), वह्या (१२%), पेन्सिल (१२%) दप्तर (१८%), नोटपॅड (डायरी व तत्सम)(१८%) यांच्या वस्तू व सेवा कराच्या दरात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. सुरुवातीस काही प्रकारच्या पेनवर १२ % तर काहींवर १८ % वस्तू व सेवा कराचा दर असल्याने दिनांक ०१/१०/२०२१ पासून सर्व प्रकारच्या पेनावरील वस्तू व सेवा कराचा दर १८ % निश्चित करण्यात आलेला आहे.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या इमारतींची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(४) * १८८९१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडा प्राधिकरणाकडून जवळपास ५० वर्षांपूर्वी पाडण्यात आलेली मौलाना आझाद रोड, भंडारवाडा, क्रॉस लेन, गिरगाव येथील इमारत खाजगी कंत्राटदार नेमून म्हाडाने नव्याने बांधल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सायन येथील प्रतिक्षा नगरातील संक्रमण शिबिरात गेली ५० वर्षे राहणाऱ्या रहिवाशांना अद्याप हक्काचे घर मिळाले नसून नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या डागडुजीसाठी आता आणखी ३० लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारतीमधील रहिवासी वर्गाने म्हाडाकडे आपली मूळ कागदपत्रे जमा करूनही कित्येक वर्षांपासून येथील रहिवाशांना संक्रमण शिबिरात राहावे लागत असून फक्त सहा रहिवाशांना ताबा पत्र देण्यात आल्याचे व नवीन इमारतीत घुसखोरी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने म्हाडाच्या इमारतींच्या निकृष्ट कामाबाबत कारवाई करण्यासंदर्भात तसेच सदरहू इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना तातडीने त्यांची घरे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) म्हाडा अधिनियम १९७६ कलम ९१ अंतर्गत इमारत क्र. ३४६-३४९, ३५२, १-३-५ भंडारवाडा या इमारतीचे भूसंपादन ताबा दिनांक २६/०७/२००४ रोजी व मालमत्तेच्या पुर्नबांधणी करिता कंत्राटदार यांना दिनांक ३०/०६/२००८ रोजी कार्यादेश देण्यात आले. तथापि, विषयांकित इमारतीच्या जागेवर जुने १ वीज उपकेंद्रामुळे (इलेक्ट्रिकल सबस्टेशन) इमारतीच्या जिन्याचे काम रखडले होते. दिनांक २८/०४/२०११ रोजी सबस्टेशन स्थलांतरीत करण्यात आले होते. तसेच सदरहू मालमत्तेतील ०२ अनिवासी भाडेकरू/रहिवाशी यांनी पुर्नबांधणीच्या कामास विरोध केला होता.

तद्नंतर पुर्नबांधणीचे काम सुरु असताना ठेकेदारांचा सन २०१७ मध्ये मृत्यू झाला. संबंधित कंत्राटदाराच्या कंपनीकडून रखडलेले काम सुरु करण्याबाबत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांचे कंत्राट रद्द करुन इमारतीचे काम इतर ठेकेदार नेमून भौतिक दृष्टया पूर्ण करण्यात आले आहे व त्यास महानगरपालिकेतर्फे दिनांक २४/०९/२०२० रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.
(२) उपरोक्त कारणांमुळे सदरहू प्रकल्पास झालेल्या विलंबामुळे भाडेकरु/रहिवाशी यांना सुविधा देण्याकरिता काही पायाभुत सुविधा व इमारतीतील जीर्ण झालेल्या भागाचे किरकोळ कामांकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(३) दुर्गादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) येथील एकूण ४४ भाडेकरु/रहिवाश्यांपैकी ३५ भाडेकरु / रहिवाशांनी मंडळाकडे कागदपत्रे जमा केली होती. त्यामध्ये ३४ भाडेकरु / रहिवाशी यांना देकारपत्र देण्यात आले आहे. उर्वरित १ भाडेकरु/रहिवाशी यांचे नाव सोडतीमध्ये नसल्यामुळे त्यांना देकारपत्र देण्यात आले नाही.

कागदपत्रे सादर केलेल्या तसेच देकारपत्र देण्यात आलेल्या ३४ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ६ भाडेकरु /रहिवाशी यांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यामुळे, पुनर्रचित गाळयांचा ताबा देण्यात आला आहे.

उर्वरित २८ भाडेकरु / रहिवाशांपैकी १२ प्रकरणे ही खरेदी विक्रीची असून, त्याबाबतचे नोंदणीकृत खरेदीखत सादर न केल्याने व उर्वरित १६ प्रकरणे ही वारसाहक्काची असल्याने वारसाहक्क प्रमाणपत्र / नोंदणीकृत हक्कसोड प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांना ताबा देणे शक्य झालेले नाही. संबंधित भाडेकरु/रहिवाशी यांना वारसा प्रमाणपत्र/ नोंदणीकृत खरेदी विक्री करारनामा सादर करण्याबाबत मंडळाकडुन बैठक घेवून निर्देश दिले असून कागदपत्रांची पुर्तता करुन घेण्याबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खोपी-पिंपळवाडी येथील डुबी नदीवरील धरणातील पाणीसाठा वापराविना पडून असल्याबाबत

**(५) * १९०३२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपी-पिंपळवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील डुबी नदीवर १९८२ मध्ये धरणाच्या बांधकामास सुरूवात होऊन माहे मे, २००४ मध्ये वा त्यादरम्यान घळभरणी झाली मात्र या धरणाला प्रत्येकी २० कि.मी.चे २ कालवे असून त्यांच्या पिंचिंगचे काम अद्याप अपूर्ण असल्याने गेल्या ५० वर्षांमध्ये त्याचा वापरच नसल्याने कालव्याची डागडुजी केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या डाव्या कालव्यांतर्गत खोपी, कुळवंडी व मिर्ले तर उजव्या कालव्यांतर्गत खोपी, कुंभाड, बिजघर व मिलियाच्या काही भागांसह शेतकऱ्यांची तब्बल १३३६ हेक्टर शेती ओलिताखाली येणार आहे, मात्र कालव्याची काही ठिकाणची सद्य:स्थिती धोकादायक असल्यामुळेच शेतकऱ्यांनी आधी कालव्याचे पिंचिंग करा, मगच पाणी सोडा, अशी भूमिका घेतल्यामुळे आजमितीस धरणातील पाणी सोडण्यात आलेले नाही, परिणामत: धरणातील मुबलक पाणीसाठा वापराविनाच पडूनच असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी एप्रिल महिन्यात धरणामध्ये १६.५० मीटर पाणीसाठा तर ४.४९ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा आहे. धरणाच्या सांडव्याचे तीनही गेट पूर्ण बंद केल्यास धरणात २७.५९ दशलक्ष घनमीटर इतका पाणीसाठा होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या धरणातील मुबलक पाणीसाठा वापराविना पडून असल्याने विनाविलंब बारमाही पिण्याचे पाणी तसेच उन्हाळयात शेती व बागायतीसाठी या धरणाच्या कालव्याची अपूर्ण असलेली सर्व कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

कालव्यांचे बहुतांश मातीकाम व त्यावरील बांधकामे सन २०१० पर्यंत पूर्ण झाली होती व कालवा अस्तरीकरण विरहीत होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) या प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यास निवडक ठिकाणी अस्तरीकरण करणे व कालव्यावरील उर्वरित बांधकाम करणेचे काम निविदा क्र. ब-१/मु.अ/१९/सन-२०१८-१९ अन्वये देण्यात आले होते.

तथापि, अभिकरणाने विहित मुदतीत काम पूर्ण न केल्याने व मंजूर सुप्रमा किंमती पर्यंत खर्च झाल्याने व निविदेअंतर्गत पूर्ण अस्तरीकरण नसल्याने प्रशासकीय व तांत्रिक कारणास्तव निविदा अंतिम करणेत आली.

उर्वरित कामाचे सर्वेक्षण व संकल्पनाचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणात विविध नैसर्गिक आपत्तींमध्ये खारभूमी क्षेत्रात झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(६) * १९६७७ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६९८४ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे व रत्नागिरी या चार जिल्ह्यांमधील ५७५ खारभूमी योजनेतील ४९ हजार १३३ हेक्टर खार भूमीचे उपजाऊ पुनःप्रापित क्षेत्र असून ही सर्वच शेती खारेपाट या नावाने ओळखली जाते व ती समुद्राच्या भरती रेषेच्या २ मीटर खाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारेपाट भागातील शेतीचे संरक्षण होण्यासाठी खाडी व समुद्रालगत बांधण्यात आलेले संरक्षण बंधारे हे समुद्राच्या उधाणाच्या भरतीच्या पाण्याने तसेच विविध नैसर्गीक आपत्तीमुळे फुटून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील आजवर आलेल्या विविध नैसर्गिक आपत्तीमुळे खारेपाट भागातील खारभूमी क्षेत्रात नुकसान झाले असून अलिबाग तालुक्यामध्ये ७ हजार ६१३.१८ हेक्टर जमिनीपैकी समुद्राचे खारे पाणी घुसुन ३०१६.६२ हेक्टर व पेण तालुक्यात ३ हजार हेक्टर जमीन नापीक झाली आहे, श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली अलिबाग तालुक्यातील ५४० शेतकऱ्यांनी, पेण तालुक्यातील २१० शेतकऱ्यांनी खारे पाणी घुसुन नापीक झालेल्या जमिनीची नुकसान भरपाई मिळावी म्हणून यापूर्वी सातत्याने शासनाकडे मागणी केलेली असतानाही, भरपाई देण्यासंदर्भात खारभूमी अधिनियम,१९७९ मध्ये तरतूद नसल्याने शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, रत्नागिरी या चार जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेसाठी खारभूमी अधिनियम १९७९ मध्ये बदल करून नुकसान भरपाईची तरतूद करण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

समुद्राला येणारी मोठी उधाणे व रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टी यामुळे काही बांधाना खांडी पडून खारेपाणी शेतात घुसण्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(३) होय.

पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी सन २०२२ मध्ये व अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी सन २०१६ मध्ये खारे पाणी घुसुन नापीक झालेल्या जमिनीची नुकसान भरपाई मिळावी म्हणून खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण-रायगड या कार्यालयाकडे अर्ज केले आहेत. खारभूमी अधिनियम, १९७९ मध्ये नुकसान भरपाई देण्याची तरतूद नसल्याने सदर अर्ज महसूल विभागाकडे हस्तांतरित केले आहेत.

(४) नुकसान भरपाई देणेसंदर्भात महसूल विभागाकडे मागण्यांचा संदर्भ करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कमला नेहरू नगर (जि.अकोला) येथे अल्पवयीन मुलाची हत्या करण्यात आल्याबाबत

**(७) * १९२९८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमला नेहरू नगर (जि.अकोला) येथे अल्पवयीन मुलाची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक २४ मे,२०२३ रोजी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास घडली असून शहरात सातत्याने प्राणघातक हल्ल्यांचे सत्र सुरु असल्याने कायदा व सुव्यवस्थेवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केला जात असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला पोलिसांचे गुन्हेगारांवरील व कायदा सुव्यवस्थेवरील नियंत्रण सुटत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

कमला नेहरू नगर, अकोला येथे दिनांक २५/०५/२०२३ रोजी जुन्या किरकोळ वादाच्या कारणावरून फिर्यादीच्या मुलाची हत्या केली असल्याच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अकोला, येथे दिनांक २६/०५/२०२३ रोजी गु.र.नं. १३६/२०२३ कलम ३०२ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर गुन्ह्यामध्ये विधीसंघर्षग्रस्त बालकास मा.बाल न्यायमंडळ, अकोला यांच्या समोर हजर करून त्यांच्या आदेशावरून बाल सुधार निरीक्षण गृह, अकोला येथे ठेवण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंजवडी (पुणे) येथील विद्युत उपकेंद्र बंद असल्याबाबत

**(८) * १९५९५ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील हिंजवडी आयटी हब मधील कंपन्यांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी महापारेषण कंपनीने ८९ कोटी रुपये खर्चून उभारलेले ४०० केव्हीचे उपकेंद्र गेल्या सात वर्षांपासून विनावापर पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील रावेत मध्येही वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने रावेतसाठी वेगळे वीज उपकेंद्रे देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंजवडीतील उपकेंद्र सात वर्षांपासून बंद असून ते सुरु करुन वीज पुरवठा सुरळीत सुरु करण्यासाठी महापारेषण कंपनीने प्रचंड दिरंगाई केली असून त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होऊन वीज पुरवठा देखील खंडीत असून परिसरातील उद्योजक व नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास होत आहे, हे ही खरे आहे का,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिंजवडी येथील उपकेंद्र तात्काळ सुरु करण्याबाबत तसेच रावेत येथे महावितरणचे उपकेंद्र उभारण्याबाबत काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे तसेच सदरचे उपकेंद्र बंद राहण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३०/०५/२०१६ रोजी कार्यान्वित (बॅक चार्ज) झालेले ४०० के.व्ही. हिंजवडी उपकेंद्र विनावापर पडलेले नसून सध्यस्थितीत २२० के.व्ही. स्तरावरुन कार्यरत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

पिंपरी चिंवड (जि.पुणे) येथील रावेत या परिसरात २०० के.व्ही. चिंचवड अतिउच्चदाब उपकेंद्रातून (स्थापित क्षमता १५० एमव्हीए, उच्चतम मागणी १२५ एमव्हीए) निर्गमित होणाऱ्या सहा २२ केव्ही वीज वाहिन्यांद्वारे अखंडित वीज पुरवठा करण्यात येतो. सदर वीज पुरवठा प्रामुख्याने भुमिगत केबलद्वारे केलेला आहे. सदर परिसरात वाढत्या नागरीकरणाच्या सोयी सुविधांकरिता महानगरपालिकेकडून वेळोवेळी रस्ता रुंदीकरण, पाईपलाईन, इ. कामांकरिता रस्त्याचे खोदकाम केले जाते. या खोदकामाच्या वेळी अनेक ठिकाणी महावितरणच्या केबलचे नुकसान होते व वीज पुरवठा खंडीत होत असल्याचे निर्दशनास आले आहे. महानगरपालिकेस त्याबाबत सुचित करण्यात आले असून महावितरण कंपनीतर्फे खंडित वीज पुरवठा प्राधान्याने पुर्ववत करण्यात येतो. या भागातील सर्व वीज ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा होण्यासाठी मान्सुनपुर्वी देखभाल व दुरुस्तीची कामे केली आहेत.

सदर परिसराचे वेगाने होणारे नागरीकरण विचारात घेऊन वाढत्या विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी नवीन २२० के.व्ही. रावेत उपकेंद्र प्रस्तावित केलेले असून तांत्रिक सुसाध्यता पडताळणी प्रक्रिया पूर्ण करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

४०० के.व्ही. हिंजवडी उपकेंद्र बंद नसून २२० के.व्ही. स्तरावरुन कार्यरत असल्याने महसुलाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. तसेच संबंधित परिसरातील वीज पुरवठा महापारेषण कंपनीकडून खंडीत नसून योग्य दाबाने सुरळीतरित्या सुरु आहे.

(४) ४०० के.व्ही हिंजवडी उपकेंद्राची स्रोत वाहिनी बाधित शेतकरी, जमीन मालक व लोकप्रतिनिधी यांचा विरोध व वन विभागाच्या मंजुरी अभावी अद्याप कार्यान्वित झालेली नाही. वन विभागाच्या मंजुरीबाबत महसूल व वन विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे. मंजुरी प्राप्त झाल्यावर व बाधित शेतकरी व जमीन मालकांना सुधारित धोरणानुसार देय असलेला मोबदला दिल्यानंतर वाहिन्या कार्यान्वित करुन सदर उपकेद्र ४०० के.व्ही. स्तरावरुन वीज भार घेण्यास तयार होईल.

तसेच महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नवीन २२० के.व्ही रावेत उपकेंद्राच्या प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी प्रक्रिया पूर्ण करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(९) * १९७९८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १२४३४ ला दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी प्रलंबित वनदावे मंजूर करण्यात यावे, आदिवासींच्या घरकुलावर वन विभागाकडून करण्यात येणारी कारवाई थांबवावी, वन जमिनीचा हक्क मिळावा, वनपट्ट्यात वीज व बोरिंग मिळावी आदी मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाकडून होत असलेली कारवाई न थांबल्यास मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारादेखील या आदिवासी बांधवांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात केला आहे तसेच 'श्रमजीवी संघटने' च्या शिष्ट मंडळाने उप जिल्हाधिकारी (ठाणे) यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वनहक्काची मान्यता कायद्याप्रमाणे मिळणे अपेक्षित असताना ठाणे जिल्ह्यातील चारही उपविभागांमध्ये वन हक्क दावेदार वंचित असून या पट्ट्यात आदिवासी बांधवांसाठी मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांचे हप्ते थांबून वन विभागाकडून त्यांच्या घरकुलावर कारवाई करण्यात येत असल्याने अनेक नागरिक बेघर होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी बांधवांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

श्रमजिवी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २३/०५/२०२३ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर तसेच अखिल भारतीय किसान सभा, ठाणे-पालघर जिल्हा कमिटी यांनी दिनांक ३०/०५/२०२३ रोजी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.
(२) श्रमजिवी संघटनेच्या शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी (ठाणे) यांना विविध मागण्यांचे निवेदन दिनांक २३/०५/२०२३ रोजी सादर केले आहे.
(३) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण, भिवंडी व उल्हासनगर या ४ उपविभाग मिळून वैयक्तिक वनहक्कासाठी एकूण १७१५७ दावे प्राप्त झाले असून, त्यापैकी १५२२४ दावे निकाली काढणेत आले आहेत. निकाली काढलेल्या दाव्यांपैकी ६४३७ दावे मंजूर करणेत आले असून, ८७८७ दावे नामंजूर करणेत आले आहेत. व उर्वरीत १९३३ दावे जिल्ह्यात प्रलंबित आहेत.

वनविभागाकडून मंजूर वनपट्यातील घरकूल योजनेंतर्गत मंजूर घरकुलांवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई केल्याचे दिसुन येत नसल्याचे वनविभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या अहवालात नमुद केलेले आहे
(४) आदिवासी बांधवाच्या इतर मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/०५/२०२३ रोजी बैठक आयोजित करून संबंधितांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरणी कामगारांना घरांचा ताबा मिळणेबाबत

**(१०) * १९८०६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५९११ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरण्यांच्या जागांवर गिरणी कामगारांना घरे देण्याच्या निर्णयानुसार १ लाख ७४ हजार गिरणी कामगार तसेच त्यांच्या वारसांनी अर्ज केले असून त्यापैकी केवळ १५ हजार घरांसाठीच सोडत निघाली असून त्यातील अनेकांना अद्यापही घरांचा ताबा मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,बृहन्मुंबईमधील ५८ गिरण्यांच्या जमिनीवर म्हाडाचा वाटा निश्चित झालेला असून ३७ गिरण्यांच्या जागेवर १३,४७६ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे कोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध झालेल्या २,४७१ सदनिका कोविड-१९ रुग्णांच्या विलगीकरणासाठी देण्यात आल्या होत्या, सदर सदनिकांची दुरुस्ती व इतर कामे करावयाची असल्याने त्याकरिता अंदाजे अपेक्षित असलेला खर्च म्हाडाकडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एम.एम.आर.डी.ए. ला प्रदान करण्याबाबत दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे पार पडलेल्या बैठकीत ठरले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बैठकीत सदनिकांच्या दुरुस्तीच्या कामाकरिता अपेक्षित असलेला खर्च एम.एम.आर.डी.ए. ने करण्यासंदर्भात उचित आदेश देण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सोडतीनुसार घरे मिळालेल्या गिरणी कामगारांना घरांचा ताबा देणेसंदर्भात तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून गिरणी कामगारांच्या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) होय.

म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांपैकी ३३ गिरण्यांचा १३.७५ हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा म्हाडास प्राप्त झाला आहे. ३३ गिरण्यांपैकी २६ गिरण्यांच्या जमिनीवर ३ टप्प्यात १३,६३६ गिरणी कामगार सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.
(३) होय.
(४) तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी दिनांक ०७/०४/२०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला होता.दरम्यान, दिनांक ०९/०३/२०२३ रोजी म्हाडा व मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांच्यात झालेल्या बैठकीत मौजे कोन, पनवेल येथील २४१७ सदनिकांच्या दुरूस्तीचा खर्च मुं.म.प्र.वि.प्रा. व म्हाडा यांच्यात ८० : २० या प्रमाणात विभागण्यात यावा. तसेच सदरचा ८०% खर्च म्हाडाकडून मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करून उर्वरीत रक्कम म्हाडाने मुं.म.प्र.वि. प्राधिकरणास हस्तांतरीत करावी, असा निर्णय सहमतीने घेण्यात आला. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत नगरविकास विभागाने कळविले आहे. त्यानुसार शासनाच्या दिनांक १९/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये म्हाडास कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.
(५) गिरणी कामगारांना वितरीत करावयाच्या सदनिकांची किंमत निश्चित करणे, सदनिका वितरणाची कार्यपध्दती ठरवणे व गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्यासाठी दिनांक १२/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुसार म्हाडाने आजपर्यंत एकूण १५,८३४ सदनिकांची गिरणी कामगारांसाठी सोडत काढली आहे. गिरणी कामगारांची पात्रता तपासणे, सोडत काढणे, सोडतीत यशस्वी ठरलेल्या गिरणी कामगारांना सदनिकांचा ताबा वेळेत मिळणे याबाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी दिनांक १६/०५/२०२३ रोजी श्री.सुनिल राणे, मा.वि.स.स. यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी जिल्हयांत व इतर जिल्हयांत मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता असल्याबाबत

**(११) * १९५८७ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सन २०२२-२३ अन्वये राज्याच्या सरासरी पेक्षा आदिवासी समाजाचे दरडोई उत्पन्न हे सुमारे ७५,५००/- रुपयाने कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदुरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न १,०५,८१३ इतके असून मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे यांचे दरडोई उत्पन्न हे सुमारे ३ लक्ष पेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही विषमता आदिवासी बहुल भागात राहणाऱ्या समाजात ७५ वर्षांत उद्योग, शिक्षण, रस्ते, पाणी इ. मूलभूत सुविधांपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने ही विषमता दूर करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करतांना काय निर्णयात्मक कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(५). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही,

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात प्रकाशित केलेले जिल्हा उत्पन्न अंदाज हे जिल्हा स्तरावरील अर्थव्यवस्थेची केवळ ढोबळमानाने कल्पना यावी यासाठी वापरले जाऊ शकतात. तथापि, कोणत्याही विशिष्ट समाजाचे दरडोई उत्पन्न परिगणित करण्यात येत नाही. सदर वस्तुस्थिती पाहता, सन २०२२-२३ च्या महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवालाच्या आधारे राज्याचे दरडोई उत्पन्न आणि आदिवासी समाजाचे दरडोई उत्पन्न यांची तुलना करता येणार नाही.
(२) अंशत: खरे आहे,

सन २०२२-२३ च्या महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवालाच्या प्रकरण ३ मधील परिशिष्ट ३.९ मध्ये नंदुरबार, मुंबई, ठाणे, नागपूर व पुणे या जिल्ह्यांचे दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे –

| अ.क्र. | जिल्हा | दरडोई उत्पन्न (रूपयात) |
|---|---|---|
| १ | नंदुरबार | १,०५,८१३/- |
| २ | मुंबई | ३,४४,३९४/- |
| ३ | ठाणे | २,९४,३६२/- |
| ४ | नागपूर | २,४६,७५०/- |
| ५ | पुणे | २,८५,४०९/- |

(३) व (४) अंशत: खरे आहे,

राज्यातील आदिवासींची सामाजिक व आर्थिक विकासाची गती वाढविण्याच्या अनुषंगाने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत खालील मुख्य योजना राबविण्यात येत आहेत :-
**उद्योग :-** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना, बीज भांडवल योजना इ.

**शिक्षण :-** शासकीय आश्रमशाळा योजना, वसतिगृह योजना, सैनिकी शाळा, साक्षर भारत अभियान, समग्र शिक्षा अभियान इ.
**रस्ते :-** मुख्यमंत्री ग्रामिण सडक योजना, सर्वसाधारण (राज्य मार्ग निधी), जिल्हा व इतर मार्ग (राज्यस्तर योजना) इ.
**पाणी :-** जल जीवन मिशन, आश्रमशाळांसाठी पाणीपुरवठा योजना, नळाने पाणीपुरवठा इ.

वरीलप्रमाणे, विविध जिल्ह्यांमधील सामाजिक व आर्थिक परिस्थिती आणि नैसर्गिक संसाधनांमधील समानता आणि जलद शहरीकरणाच्या आवाहनांना सामोरे जाण्याची गरज लक्षात घेऊन तसेच प्राप्त मागणीच्या अनुषंगाने आदिवासी समाजास मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना 'महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजना' लागू करण्याबाबत

**(१२) * १८९०८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना 'महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजना' लागू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.गृह मंत्री महोदयांकडे दिनांक ९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना 'महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजना' लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

महाराष्ट्र राज्याच्या पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या, महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) अधिनियम, १९६१ मधील "कुटुंब" या संज्ञेमध्ये समाविष्ठ असणाऱ्या व्यक्तींकरिता 'महाराष्ट्र राज्य पोलीस कुटुंब आरोग्य योजना' लागू करण्यात आली आहे. यात सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी/अंमलदार यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. तथापि, दिनांक २८/०६/२०२३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महात्मा फुले जन आरोग्य योजना सर्व नागरिकांसाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात कोयता गँगचे हल्ले वाढत असल्याबाबत

**(१३) * २००१३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील आप्पा मांढरे यांचेवर तरुणांच्या टोळीने केलेला गोळीबार तसेच दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी याच तरुणांच्या टोळीने हितेंद्र सावंत, माजी जि.प.सदस्य यांच्यावर कोयत्याने केलेला हल्ला तसेच दिनांक ६ जून, २०२३ रोजी सातारा पंचायत समितीचे माजी सदस्य यांचेवर व त्यांच्या पत्नीवर याच टोळीकडून कोयत्याने हल्ला करुन जबर जखमी केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा जिल्ह्यात मोठ्या पदावर असणाऱ्या व्यक्तींविरुध्द व राजकीय पक्षांच्या नेत्यांवर कोयता टोळीने हल्ला करुन त्यांना जखमी केल्याच्या घटना वारंवार घडत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोयता टोळींविरुध्द कारवाई करण्याबाबत पोलिसांनी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदरच्या तीनही घटना घडल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापि, सदरच्या घटनांमध्ये हल्ले एकाच टोळीने केलेले नाहीत.

(२) नाही.

(३) सदर तीनही घटनांमध्ये करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे :-

१) आप्पा मांढरे यांच्यावर झालेल्या हल्याविरुध्द शाहुपूरी पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं.३५८/२०२२, भा.दं.वि. कलम ३०७, १२० (ब), ३४, सह आर्म ॲक्ट कलम ४, २५ प्रमाणे दिनांक १०/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ विधीसंघर्षीत बालके व इतर ४ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

२) हितेंद्र सावंत यांच्यावर झालेल्या हल्याबाबत सातारा तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०३/२०२३, भा.दं.वि. कलम ३०७, ३४ प्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये २ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून १ विधीसंघर्षीत बालकाबाबत मा.न्यायालयास अहवाल सादर करण्यात आला आहे.

३) सातारा पंचायत समितीचे माजी सदस्य व त्यांच्या पत्नीवर झालेल्या हल्याबाबत सातारा शहर पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं.४६२/२०२३, भा.दं.वि. कलम ३०७, ४५२, ३९४, १२० (ब), ३४ प्रमाणे दिनांक ०७/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याच्या अनुषंगाने तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सातपुडा पर्वत रांगेतील गुळ मध्यम प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला मिळणेबाबत

**(१४) * २०१४६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुडा (ता.चोपडा, जि.जळगाव) पर्वत रांगेतील गुळ मध्यम प्रकल्पासाठी संपादीत झालेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १६ वर्षांचा कालावधी होऊनही अद्यापपावेतो तापी पाटबंधारे महामंडळाकडून दिला गेला नसल्याने पिडीत शेतकऱ्यांनी दिनांक ७ एप्रिल,२०२३ रोजी ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने गुळ मध्यम प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे
(२) गुळ मध्यम प्रकल्पांतर्गत वितरीकांच्या कामाकरिता सन-२००८ पासून भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. त्यानुसार वितरीकांच्या कामासाठी आवश्यक असलेल्या जमिनींचा ताबा सन-२००८ मध्ये घेण्यात आलेला आहे.

त्यावेळी एकूण ३८ प्रस्तावांपैकी २२ प्रस्तावांमध्ये भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, उर्वरीत १६ प्रस्तावांची कार्यवाही प्रगतीत असताना नविन भूसंपादन कायदा-२०१३ अंमलात आल्याने सदरील प्रस्ताव व्यपगत झाला. उर्वरित १६ प्रस्तावातील जमिनी थेट खरेदी पध्दतीने संपादन करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलीस वसाहतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) * २०२४३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी, नायगाव या मोठ्या पोलीस वसाहतींसहगिरगावमधील विठठलभाई पटेल मार्ग पोलीस ठाण्याच्या आवारात असलेल्या पोलीस वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विठठलभाई पटेल मार्ग पोलीस ठाण्याच्या आवारात असलेल्या पोलीस वसाहतीच्या इमारतीचे तुटलेले जिने, इमारतीवरील छपरांना लागलेली गळती, शौचालयाची दुरवस्था अशा परिस्थितीत ४० पोलीस कुटुंबे तिथे राहत असून सदर धोकादायक इमारत कोसळून मोठी जिवितहानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील वरळी, नायगाव या मोठ्या पोलीस वसाहतींसह शहरात एकूण ४६ पोलीस वसाहती आहेत यामध्ये हजारो पोलीस कुटुंबीय वास्तव्य करित असून सदर पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असल्याने या निवासस्थानांच्या दुरुस्तीबाबतची मागणी राज्याचे मा.उप मुख्यमंत्री (गृह), मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम), मा.पोलीस महासंचालक यांच्याकडे दिनांक १७ एप्रिल, २०२३ वा त्यासुमारास पोलीस कर्मचाऱ्यांनी तसेच ‘समर्थन’ संस्थेने निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त इमारतींची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीअंती पोलीस वसाहतीच्या पुनर्बांधणीसंदर्भात तसेच निधीची तरतूद करणे व प्रशासकीय मान्यतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) होय, वरळी, नायगाव येथील नादुरुस्ती झालेल्या वसाहतींची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जात आहे. तसेच व्ही.पी.मार्ग पोलीस ठाणे हददीतील पोलीस इमारतींची दुरवस्था झाल्यामुळे सदर इमारतीतील पोलीस कर्मचारी यांना पर्यायी निवासस्थानांचे वाटप करण्यात आले आहे. उक्त इमारतींच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करण्यात येऊन, पुनर्बांधणी / दुरुस्तीबाबत अंदाजपत्रक सादर केले जातात, त्यानुसार शासनाकडून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन, निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात येतात.

-----------------

## सूर्या प्रकल्पाचे मूळ सिंचन क्षेत्र कायम ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * २०५२६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मूळ सिंचन प्रकल्प म्हणून निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यातील धामणी व कवडास धरण अर्थात सूर्या प्रकल्पांतर्गतील पाणी विविध कारणांसाठी वळविल्यामुळे मूळ सिंचन क्षेत्रात घट झाली असल्याची बाब दिनांक ११ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे मूळ सिंचन क्षेत्र कायम ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश तत्कालीन मा.राज्यपाल महोदयांनी राज्य शासनास लेखी निवेदनाद्वारे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निर्देशांन्वये सूर्या प्रकल्पाचे मूळ सिंचन क्षेत्र कायम ठेवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सूर्या प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा २८६.३१ द.ल.घ.मी. असून त्यापैकी बिगरसिंचनासाठी २२६.९३ द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षित करण्यात आला आहे. परिणामस्वरूप, सिंचनासाठी प्रत्यक्ष पाणीसाठा कमी उपलब्ध होत असल्याने सूर्या प्रकल्पाचे सिंचनक्षेत्र कमी होण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते.
(२) अंशत: खरे आहे.

मा.राज्यपाल,महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ५/५/२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये मा.राज्यपाल यांनी नगरविकास विभाग, जलसंपदा विभाग, आदिवासी विकास विभाग व जलसंधारण विभाग या विभागांच्या सचिवांमार्फत समिती गठीत करून सूर्या प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्राची कपात न करता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

(३) यासंदर्भात कवडास उन्नैयी बंधाऱ्याच्या अधोबाजूस द्वारयुक्त नवीन बंधारा बांधून अतिरिक्त १३.४१ दलघमी पाणीसाठा निर्मित करण्याच्या अनुषंगाने कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांच्यामध्ये दिनांक ०६/०९/२०१९ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. दिनांक ११/११/२०१९ रोजी सदर कामाचे कार्यारंभ आदेश संबंधित कंत्राटदारास देण्यात आले आहेत. कवडास उन्नैयी बंधाऱ्याचे काम मे, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.

सूर्या नदीवर ५ को.प. बंधारे बांधून २.२९ दलघमी पाणीसाठा निर्मित करण्याच्या अनुषंगाने कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांच्यामध्ये दिनांक २२/०१/२०२१ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने ५ को.प. बंधाऱ्यांपैकी घोळ व चिंचारा को.प. बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत ३ को.प. बंधाऱ्याच्या बांधकामबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

सुर्या प्रकल्पाच्या कालव्यांची वहन क्षमता वाढवून सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दिनांक ०२/०२/२०१७ मधील मार्गदर्शक सूचनांनूसार सूर्या उजवा तीर कालवा व डावा तीर कालव्याच्या लाभक्षेत्रातील बंदीस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन निर्मिती करण्याचे नियोजित आहे. त्याकरिता आवश्यक संकल्पन मंजुरीची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेवगाव (जि.अहमदनगर) येथे दरोडा टाकून व्यापारी दांपत्याची हत्या केल्याबाबत

**(१७) * २०७०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव (जि.अहमदनगर) येथील मारवाडी गल्लीमधील आडत व्यापाऱ्याच्या घरी दरोडा टाकण्यात येऊन त्यांची व त्यांच्या पत्नीची हत्या करण्यात आल्याची घटना माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घडली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील हत्या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे काय तसेच दरोडा टाकण्यात आलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेची व तपासाबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तसेच, आरोपींना पकडून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे,

सदर घटना दिनांक २३/०६/२०२३ रोजी घडली असून यामध्ये फिर्यादीचे पती व जाऊबाई यांची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२), (३) व (४)

सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीनुसार शेवगाव पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु.र.नं.५५२/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, ३९७, ४६० प्रमाणे दिनांक २३/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपीस दिनांक २५/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक ०४/०७/२०२३ रोजी न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. सदर गुन्ह्यात आरोपी कडून रुपये ९८,०००/- किंमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यातील इतर संशयीत चिजवस्तु जप्त करण्यात आल्या असून सी.सी.टीव्ही फुटेज व इतर बाबी तपासून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * २०८२१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये विशेषत: नागपूर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरित्या पिस्तुल, देशी कट्टा व इतर धारदारशस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींवर शेकडो फौजदारी गुन्हे सन २०२२-२३ या वर्षभरात दाखल झाले असून कळमना भागात घरात शस्त्र बनविण्याचा कारखाना चालविणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींवर कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी तसेच घरात शस्त्र बनविण्याचा कारखाना चालविणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात अवैधरित्या शस्त्र बाळगल्या प्रकरणी सन २०२२-२३ मध्ये ६,१५२ गुन्हे दाखल करण्यात आले असून नागपूर शहरांतर्गत याबाबतचे ६०५ गुन्हे पोलीसांकडून दाखल करण्यात आले आहेत. कळमना भागात अवैध शस्त्रे बनविताना आढळून आल्याने सदर व्यक्तीविरुध्द कळमना पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे गु.रुपये क्र.५१८/२०२३, भा.ह.का.कलम ३, ४, ५, २५ सह म.पो.का.कलम १३५ अन्वये गुन्हादाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.
(२) अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींना आळा बसविण्याच्या दृष्टीने गोपनीय बातमीदाराकडून माहिती घेण्यात येते, वेळोवेळी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात येते, संशयितांची घर झडती घेण्यात येते, दिवसा व रात्री पेट्रोलिंग सुरु असते. अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुध्द शस्त्र अधिनियम १९५९ व शस्त्र नियम २०१६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध तीर्थक्षेत्र स्थळांवर भाविकांकरिता मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) * १९९६६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथे दर्शनासाठी आलेल्या काही दिव्यांग भक्तांना दर्शनाची कोणतीच वेगळी व्यवस्था नसल्याने दर्शनाविनाच परतावे लागल्याची घटना माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अष्टविनायकमधील एक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली येथेही नागरिक, पर्यटक व भक्तांकरिता एकही स्वच्छतागृह नसल्याची तसेच एस.टी.स्टॅण्ड व अन्य ठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी असणाऱ्या संबंधित संस्थांची व्यवस्थापकीय मंडळे यांचेकडून तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या दिव्यांग पर्यटक व भक्तांच्या दर्शनासाठी तसेच त्यांचेकरिता स्वतंत्र राहण्याची, शौचालयांची व्यवस्था यांसारख्या मूलभूत सोई सुविधां मिळणेबाबत उपाययोजना करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भेट देणारे सर्वसामान्य, दिव्यांग भक्त व पर्यटक यांचेकरिता स्वतंत्र दर्शनाची व्यवस्था, शौचालय व राहण्याची व्यवस्था अशा मूलभूत सुविधा शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल सभामंडप येथून दिव्यांग भक्तांना थेट दर्शनाची सोय करण्यात येते व त्यासाठी व्हिल चेअर देखील उपलब्ध आहेत. तसेच मंदिर परिसरात ई-रिक्षा देखील मोफत उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पाली शहरात अष्टविनायकापैकी एक श्री बल्लाळेश्वर देवस्थान असून मंदिर परिसर व भक्तनिवास येथे अद्ययावत सर्व सुविधांनी युक्त अशी पुरुषांसाठी १७,महिलांसाठी १५ आणि दिव्यांगासाठी ३ अशी प्रसाधनगृहे भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आली आहेत. सदर प्रसाधनगृहे सुस्थितीत आहेत व त्याची स्वच्छता राज्य परिवहन महामंडळाकडून वेळोवेळी करण्यात येत असून प्रसाधनगृहात पाण्याची सोय आहे. मंदिर व्यवस्थापनातर्फे दिव्यांगांसाठी व्हील चेअर, रॅम्पची सुविधा उपलब्ध असून त्यांची प्राधान्याने दर्शन व्यवस्था करण्यात येते. तसेच दिव्यांगांसाठी भक्तनिवास १ व भक्तनिवास २ येथे राहण्याची सोय केलेली आहे.

(३) व (४)

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर यांच्यामार्फत दिव्यांग भाविकांना मोफत ई रिक्षा, व्हिल चेअर, श्री विठ्ठल सभामंडप येथून थेट दर्शनाची सोय, मंदिर व दर्शनमंडप येथे शौचालयाची सोय, भक्तनिवास येथे प्राधान्याने निवास व्यवस्था इत्यादी सोई सुविधा मंदिर समिती मार्फत उपलब्ध करुन देण्यात येतात.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या दिव्यांग पर्यटक व भाविकांना दर्शनासाठी थेट प्रवेश देण्यात येतो. तसेच वृध्द व पायाने अपंग असलेल्या भाविकांना महाद्वार येथून मंदिरात जाणे-येणेसाठी खुर्चीची व्यवस्था करण्यात येते. मंदिर परिसरात विविध ठिकाणी शौचालयाची व्यवस्था उपलब्ध आहे. तसेच मंदिर संस्थानच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या सर्व सामान्य भाविकांना

दर्शनासाठी पाच मजली दर्शन मंडपाद्वारे प्रवेश देण्यात येतो. सदर दर्शन मंडपामध्ये शौचालये, हिरकणी कक्ष, अग्नीशमन यंत्रणा इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच दिव्यांग भाविकांना दर्शनासाठी थेट प्रवेश देण्यात येतो. तसेच, मंदिर संस्थानचे वतीने भाविकांना राहण्यासाठी मंदिर संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाजवळ तसेच घाटशीळ मंदिरानजीक भक्त निवासाची निर्मिती करण्यात आलेली असून ते आऊटसोर्सिंग मार्फत चालविण्यात येतात.

शहर कोल्हापूर येथील तीर्थक्षेत्र श्री करवीर निवासिनी मंदिराकडे दिव्यांग व्यक्तींकरीता दरवाजावर व्हील चेअरची सोय करण्यात आली असून व्हील चेअर वरुन रॅम्पद्वारे मंदिरामध्ये दर्शनाकरीता प्रवेश देण्यात येतो. सध्या मंदिराकडे देवस्थान समितीची कोणतीही राहणेची सोय उपलब्ध नाही. दिव्यांग व्यक्तींकरीता मंदिराकडे भवानी मंडप येथील पागा इमारत येथे शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडील फंडातून नव्याने सर्व सोईयुक्त शौचालयाचे बांधकाम सुरु आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दिव्यांग साईभक्तांचे दर्शनाकरीता मंदिर परिसरातील गेट नं.०३ येथे स्वतंत्र व्यवस्था, व्हीलचेअर्स, रॅम्प, निवासव्यवस्था, लिफ्ट व स्वच्छतागृहात कमोडची व्यवस्था करण्यात आली आहे. मंदिर परिसर, प्रसादालय, सेवाधाम, बस स्थानक व बस स्थानकासमोर प्रसाधनगृहाची, सुलभ शौचालयांची व्यवस्था करण्यात आली असून त्यामध्ये १२३ टॉयलेट व १२३ बाथरुमची व्यवस्था आहे. नवीन अद्ययावत दर्शनरांग इमारतीमध्ये दिव्यांग व्यक्तीकरिता रॅम्प, लिफ्ट तसेच १३ टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे.श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत साईभक्तांचे सुविधेसाठी निवासस्थाने, श्री साई प्रसादालय, अत्याधुनिक रुग्णालये, अद्ययावत दर्शनरांग प्रकल्प इत्यादी इमारती उभारणे आलेल्या असून शिर्डी शहराचे अंतर्गत रस्ते,पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र तलाव इत्यादी सुविधा निर्माण केलेल्या आहेत.

श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे दिव्यांग, वयोवृध्द तसेच गरोदर स्त्रियांना " श्रीं" च्या दर्शनासाठी प्राधान्याने व्यवस्था करण्यात आली आहे. मंदिरात दिव्यांगांसाठी व्हील चेअरची व्यवस्था असून आवश्यकता असल्यास त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीस दिव्यांगासह दर्शनासाठी थेट प्रवेश देण्यात येतो. मंदिराच्या परिसरात सर्व भाविकांसाठी नि:शुल्क सुलभ शौचालय आणि पाणपोईची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अंगारकी संकष्टीला भाविकांच्या रांगा व्यवस्थापनासाठी मंदिराबाहेर मंडप उभारण्यात येतो, फिरत्या सुलभ शौचालयांची व्यवस्था केली जाते, अत्यावश्यक वैद्यकीय सेवेसाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था केली जाते, पावसाळ्यात व उन्हाळ्यात भाविकांसाठी शेड बांधली जाते. न्यासाकडे जागेअभावी भक्तांसाठी भक्तनिवास उभारणे शक्य होत नाही.

ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतंर्गत राज्यातील "क" वर्ग तीर्थक्षेत्रांना दिनांक १६ नोव्हेंबर,२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ब-वर्ग दर्जा देण्यात येतो. तद्नंतर सदर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मंदिर पोहोच रस्ता, पथदिवे, संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची टाकी, स्त्री- पुरुष शौचालये व स्नानगृह, भक्तनिवास, वाहनतळ व पेविंग ब्लॉक अशा कामांसाठी रुपये २.०० कोटी मर्यादेत निधी दिला जातो. ग्रामविकास विभागाने राज्यातील ४८० ग्रामीण तीर्थक्षेत्रास ब-वर्ग दर्जा दिला असून आतापर्यंत रुपये २४१.५० कोटी इतक्या रक्कमेच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

राज्यातील प्रत्येकिजल्ह्यात मंजूर “ ब” आणि “क” तिर्थक्षेत्रांपैकी काही तिर्थक्षेत्रे धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असून सदर नोंदणीकृत न्यासासंबंधी मूलभूत सुविधांबाबत सद्य:स्थितीत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सदर बाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित न्यासाच्या विश्वस्त व्यवस्थांना उपाययोजनेसंबंधी योग्य ते निर्देश देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जायकवाडी धरण प्रकल्पग्रस्तांना थकबाकीची रक्कम देण्याबाबत

**(२०) * १९३५६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी प्रकल्पांतर्गत सरळ खरेदीने व भुसंपादन कायदा २०१३ नुसार शेतकऱ्यांकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापही जमीनधारकांना मिळाला नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन वर्षांपासून मोबदला मिळण्याकरिता भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, उप जिल्हाधिकारी कार्यालय येथे शेतकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा केला असता उक्त कार्यालयाकडून शासनाकडे अनुदानाची मागणी केली असूनही शासनाकडून निधी प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकअदालतमध्ये अजुनही तडजोडीची प्रकरणे सुरु असून न्यायालयातही अनेक प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत यात गंगापूर, वैजापूर, फुलंब्री, खुलताबाद व इतर तालुक्यातही १०० हून अधिक प्रकरणात अनुदान प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने शेतकऱ्यांना/धरणग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे, अंशतः खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पाशी संबंधित सुरेगांव (गंगा) ता.नेवासा जि.अहमदनगर (६.३९ हे.) व घेवरी ता.शेवगांव जि.अहमदनगर (६२ आर) ही प्रकरणे सरळ खरेदीने संपादित करणे प्रगतीत आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) हे, अंशतः खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पाशी संबंधित कलम १८/२८ ची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत तसेच अतिरिक्त क्षेत्रात प्रकल्पाचे पाणी जात असल्याने शासन निर्णय दिनांक २१/९/२०१२ नुसार कार्यवाही करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. मागणीनुसार अनुदान प्राप्त होत आहेत. प्राप्त अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराबाबत

**(२१) * १८८९३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ७४४२ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय रुग्णालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ अ अ अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेंतर्गत गरीब रुग्णांना एकूण क्षमतेच्या १० टक्के खाटा मोफत देणे तसेच १० टक्के खाटांना ५० टक्के सवलतीमध्ये उपचार करण्याची तरतूद असताना या तरतुदींचे पालन धर्मादाय रुग्णालयांकडून होत नसल्याचे माहे मे, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयांकडून सर्रासपणे रुग्णांची लुट केली जात असून १५० रुग्णांनी रुग्ण हक्क परिषदेकडे आपल्या तक्रारी नोंदविल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईकरांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न असताना त्यांना औषधेही रुग्णालयातून मिळत नसून ती रुग्णालयासमोरील खाजगी मेडीकलमधून घेण्यास रुग्णांना भाग पाडले जात असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करून मुंबईतील गरीब रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात अद्ययावत आरोग्य सुविधा, औषधे उपलब्ध करून देण्याबाबत तसेच १५० रुग्णांनी रुग्ण हक्क परिषदेकडे नोंदविलेल्या तक्रारींबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर मा.उच्च न्यायालयीन योजनेच्या खंड १६ नुसार प्रत्येक जिल्हास्तरावर धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत देखरेख समिती, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९/११/२०१२ अन्वये गठीत तपासणी समिती तसेच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेमार्फत वेळोवेळी निरीक्षण घेण्यात येते. निरीक्षणामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास संबंधित रुग्णालयाला आवश्यक निर्देश देण्यात येतात व त्याची पूर्तता करुन घेण्यात येते. जर त्रुटींची पूर्तता केली नाही तर संबंधित रुग्णालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४१ अअ व मा.उच्च न्यायालयीन योजनेच्या तदतुदींनुसार उचित कार्यवाही करण्यात येते. तसेच, १५० रुग्णांकडून रुग्ण हक्क परिषदेकडे तक्रारी नोंदविल्याबाबत कुठलीही तक्रार धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील सौर कृषीवाहिनी योजनेतील चार प्रकल्प नादुरूस्त असल्याबाबत

**(२२) * १९०२१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषीपंपांना दिवसा वीज पुरविण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना बारा तास वीज पुरवठ्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना दुसऱ्या टप्प्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात स्थापित प्रकल्पाचे व्यवस्थापनच होत नसल्याने वर्धा जिल्ह्यातील सातपैकी चार प्रकल्प बंद पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा जिल्ह्यांच्या आष्टी तालुक्यात साहूर व तळेगाव आर्वी तालुक्यातील पिंपळखुटा, खरागण व आंजी (मोठी) देवळी तालुक्यात विजयगोपाळ आणि कारंजा घाडगे तालुक्यातील कारंजा येथे सदर प्रकल्प उभारण्यात येऊन ते कार्यान्वित झाल्यानंतर काही वर्षातच सदर सातपैकी चार प्रकल्प बंद पडलेले असून प्रकल्पाच्या व्यवस्थापनाकरिता कंपनीला निधी दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंद पडलेले प्रकल्प पुन्हा सुरु होण्याबाबत तसेच कंपनीला निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना अखंडित व शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठीचे अभियान दिनांक ८ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत माहे डिसेंबर, २०२५ अखेर राज्यातील किमान ३० टक्के कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत मेसर्स ई. ई. एस. एल. द्वारे वर्धा जिल्ह्यात मौजे- साहूर (०.५१ मे. वॅ.) पिंपळकुटा (०.६३ मे.वॅ.), खरांगणा (०.५४ मे.वॅ.), विजयगोपाळ (०.७ मे.वॅ.), आंजी (०.५ मे.वॅ.) कारंजा (०.५ मे.वॅ.), काकडदरा (४.२ मे.वॅ.), समुद्रपुर (१.६ मे.वॅ.), असे एकूण ८ सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहे. त्यापैकी साहूर, पिंपळखुटा, खरांगणा आणि विजयगोपाल येथील प्रकल्प बंद आहेत.

मेसर्स ई. ई. एस. एल. कंपनीने सदर सौर ऊर्जा प्रकल्पांच्या देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी मे. सीईएल कंपनीसमवेत २५ वर्षाकरीता करार केला आहे. परंतु सीईएल कंपनीने त्यांची कामे व जबाबदारी समर्थपणे पार न पाडल्यामुळे व करारनाम्यातील बंधनांचे पालन न केल्याने मेसर्स ई. ई. एस. एल. कंपनीने मे. सीईएल कंपनीला दिनांक २७/०६/२०२२ व दिनांक ३१/०१/२०२३ रोजी नोटीस बजावली. दरम्यान मे. सीईएल कंपनीने मा.उच्च न्यायालय, दिल्ली येथे याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने सद्य:स्थिती जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यामधील मंदिरांत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(२३) * १९६७६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौल (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील दत्त मंदिराच्या गाभाऱ्यातील सुमारे चाळीस किलो चांदीचा पत्रा चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना दिनांक १६ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली परंतु या घटनेला ५ महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा चोरीचा तपास अद्यापपर्यंत लागलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी कार्लेखिंड येथील पात्रुदेवी मंदिरात चोरी झाली असून या घटना ताज्या असतानाच, दिनांक १८ मे, २०२३ रोजी अलिबाग तालुक्यातील थेरोंडा-खंडेरावपाडा येथील कोळी समाजाच्या खंडोबा मंदिरातून देवांच्या सहा चांदीच्या मूर्ती तसेच मुंबईकर व डोलके कुटुंबियाच्या देवाच्या सर्व चांदीच्या मूर्ती असे एकूण सुमारे ५ किलो ३६० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या मूर्तींच्या चोरीची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर चोरीच्या घटनांचा तपास करण्यासाठी कोणती यंत्रणा राबविण्यात आली तसेच संबंधित आरोपींविरूध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मंदिरांमध्ये होत असलेल्या चोऱ्यांच्या घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) चौल ता.अलिबाग येथील दत्त मंदिरातील दिनांक १६/१२/२०२२ रोजी मंदिराच्या गाभाऱ्यातील नक्षीकाम केलेला ४० कि.ग्रॅ. चांदीचा पत्रा चोरीस गेल्याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गु.र.नं.२६४/२०२२ भा.द.वि.कलम ४५७,३८०,३४ नुसार दिनांक १६/१२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड यांच्याकडून सुरु आहे.
(२) व (३) होय. दिनांक १८/०५/२०२३ रोजी ५.३६० कि.ग्रॅ. चांदीच्या मुर्तीच्या चोरीची घटना घडल्याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गु.र.नं. ११९/२०२३ भा.दं.वि. कलम ३८०, ४५७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये दिनांक ३०/०५/२०२३ रोजी आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याकडून एकूण रुपये १,६०,८००/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहेत.
(४) मंदिरामध्ये होत असलेल्या चोरीच्या घटना रोखण्यासाठी जिल्ह्यात पोलीस ठाणे स्तरावर प्रभावी रात्रगस्त, नाकाबंदी/कोंबींग ऑपरेशन राबविले जाते. तसेच, रात्रगस्ती दरम्यान अशाप्रकारचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील आरोपी यांची तपासणी केली जाते. गुडमॉर्निंग पथक, बिटमार्शलद्वारे वेळोवेळी मंदिर तसेच इतर धार्मिक स्थळांना भेटी देणे, मंदिर परिसरातील सी.सी. टिव्ही यंत्रणा कार्यान्वित करुन घेण्यास कळविणे, मंदिर ट्रस्टच्या मदतीने सुरक्षा रक्षक नेमणे, ग्रामीण स्तरावर ग्रामस्थांच्या मदतीने ग्राम सुरक्षा दल स्थापन करुन संवेदनशील परिसरात सतर्क गस्त करुन अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्याकरीता उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(२४) * १९६१५ श्री.अमोल मिटकरी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १७२५५ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत जानेवारी ते मार्च, २०२३ दरम्यान सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये २७.८७ % वाढ झाल्याचे पोलिसांच्या आकडेवारीतून माहे मे,२०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सायबर गुन्ह्यांमध्ये गत वर्षी रुपये ५०० कोटी आणि जानेवारी ते एप्रिल, २०२३ या कालावधीत रूपये १२८ कोटी इतकी रक्कम लुटण्यात आली असून गत चार महिन्यांत मुंबईत सर्वाधिक १, ४१७ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून सुमारे ६६ कोटी रुपये लुटल्याची बाब दिनांक १० जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात घडलेल्या सायबर गुन्ह्यांचा तपास शासनाने केला आहे काय, सदरहू तपासात किती गुन्ह्यांची उकल झाली आहे आणि त्यातून किती रक्कम परत मिळविण्यात आली आहे,
(४) असल्यास, अनेक प्रकरणांमध्ये नागरिक पोलिसांकडे तक्रार करित नसल्याने गुन्ह्याची आकडेवारी अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर सायबर गुन्हेगारी रोखण्याच्या अनुषंगाने शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई मध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत जानेवारी ते मार्च,२०२३ दरम्यान सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये ११.४५ % वाढ झाली आहे.
(२) होय
(३) राज्यात घडलेल्या सायबर गुन्हयांचा तपासाचा तपशील खालीलप्रमाणे.
वर्ष दाखल गुन्हे उघड गुन्हे अटक आरोपी गेलेली रक्कम हस्तगत रक्कम
२०२२ ५९०३ ५८९ १९९६ ४९९,५१,४८,१७९/- १२,२७,८९,९१२/-
२०२३ एप्रिल अखेर २२७५ १५३ २४४ १३१,२२,४०,१३५/- ३,९४,४८,५६७/-
(४) नागरीकांसोबत झालेल्या सायबर गुन्हयांबाबत त्यांना तात्काळ तक्रार देता यावी याकरीता पोलीस विभागाकडुन त्यांना वेगवेगळया सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत त्यामध्ये ऑनलाईन तक्रार, हेल्पलाईन क्र.१९३० वर संपर्क साधणे, नजीकच्या पोलीस ठाणे अथवा सायबर पोलीस ठाणे येथे जाऊन तक्रार नोंदविणे, ई-मेलव्दारे तक्रार देणे, या मार्गांचा समावेश होतो.
(५) सायबर गुन्हेगारी अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाय योजना खालीलप्रमाणे.

राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता ४६ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत, तसेच मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. सायबर गुन्ह्यांचा आळा घालण्याकरीता विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसाम्रगी, सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत १००० पोलीसांना सायबर, गुन्ह्यांच्या तपासात मदत व्हावी यासाठी तज्ञ सल्लागारांच्या मदतीने फॉरेन्सिक टुल्सचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जगजागरूकता शिबिरे घेतली जातात तसेच सोशल मिडियाव्दारे, इंटरनेट माध्यमांव्दारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्हयांच्या अनुषंगाने सावध राहण्याबाबत कळविण्यात येते. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठ मार्गदर्शिका (ॲडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते. नॅशनल

सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टलच्या माध्यमातून सायबर गुन्हं संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी हाताळण्यात येतात व या पोर्टलच्या संकेतस्थळावरून तक्रारी दाखल करण्यास नागरिकांना आवाहन करण्यात येते.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेसह अन्य योजनांचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(२५) * १९६०८ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाशिम जिल्हा आकांक्षी जिल्हा म्हणून घोषित असल्याने गरजू व होतकरू व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या मुद्रा योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षात जिल्ह्यात उद्दिष्टापेक्षा अधिक कर्ज वितरीत करण्यात आले मात्र पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेसह इतर काही विमा योजनांच्या उद्दिष्टात जिल्ह्यांची पीछेहाट झाल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयात माहे एप्रिल, २०२३ मध्ये झालेल्या बैठकीत विविध योजनांचा आढावा घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचे व इतर योजनेचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. जिल्हाधिकारी, वाशिम यांनी दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी आढावा बैठक घेतली. सदर आढावा बैठकीमध्ये माहे मार्च, २०२३ अखेर साध्य खालीलप्रमाणे निदर्शनास आले.

| अ.क्र. | योजनेचे नाव | साध्य (टक्के) |
|---|---|---|
| १ | मुद्रा योजना | १०५.८२ |
| २ | पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना | ६३.७० |
| ३ | पंतप्रधान सुरक्षा विमा योजना | ५६.३७ |
| ४ | अटल पेंशन योजना | ११७.७५ |
| ५ | प्रधानमंत्री जनधन योजना | ९९.१४ |

(३) योजनांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना व्हावा या उद्देशाने केंद्र शासनाच्या वित्तीय सेवा विभागाच्या दिनांक २१ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार दिनांक ०१ एप्रिल, २०२३ ते ३० जून, २०२३

या कालावधीत वाशिम जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर बँकांनी ८९४ शिबिरांचे आयोजन केले. सद्य:स्थितीत शिबीर आयोजनासाठी केंद्र शासनाने दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेनोडा शहीद (जि.अमरावती) गावाच्या परिसरातील आदिवासी बहुल गावांना जाणाऱ्या रस्त्यांची दूरवस्था झाल्याबाबत

**(२६) * १९७९९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बेनोडा शहीद (जि.अमरावती) गावापासून तीन किमी अंतरावरील आदिवासीबहुल बेलवडा ते धामणधस,बेनोडा ते पळसोना, मागोना, बेनोडा ते माणिकपूर गावाला जाणाऱ्या रस्त्यांमध्ये खड्डे पडून या रस्त्यांची दूरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावातील शाळकरी मुले, आबालवृध्द रुग्ण व महिलांची या रस्त्याने मोठी गैरसोय होत असल्याने बेनोडा शहीद बस स्टॉप वर २९ एप्रिल,२०२३ पासून आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेनोडा शहीदच्या परिसरातील आदिवासी बहुल गावांतील रस्ते खड्डे मुक्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) •बेनोडा ते धामणदस रस्ता (ग्रामा ४६) या रस्त्यापैकी काही लांबीच्या रस्त्याची सुधारणा प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण सुधारणा योजनेतंर्गत प्रस्तावित असून उर्वरित लांबीच्या रस्त्याची सुधारणा लेखाशीर्ष ३०५४ २४१९ अंतर्गत करण्याचे नियोजित आहे.
•बेनोडा ते पळसोना ग्रामा ३१ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हा नियोजन कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून जिल्हा परिषद अमरावती यांचे मार्फत करण्याचे नियोजित आहे.
•पळसोना ते मांगोना या रस्त्याची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.
•बेनोडा ते माणिकपूर रस्ता (ग्रामा १९६) या रस्त्याचे काम आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद अमरावती यांचे मार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्तकनगर (जि.ठाणे) येथे म्हाडाच्या नियमांचे उल्लंघन करून विकासकाने रहिवाशांना बेघर केले असलेबाबत

**(२७) * १९४८७ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे (जि.ठाणे) येथील वर्तकनगरमध्ये सुस्थितीत असणाऱ्या इमारती धोकादायक ठरवून १६० कुटुंबांना बेघर करणे, विकासकाच्या फायदयासाठी म्हाडाच्या नियमांचे उल्लंघन करणे तसेच रहिवाशांची फसवणूक करून मोठा प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र नगर येथील १८ इमारती धोकादायक ठरवून त्यांचे पुनर्निमाण करण्यासाठी इमारती पाडून विकासकाने रहिवाशांना मागील एक वर्षापासून भाडे देणे बंद केले असून उक्त भूखंडावर विकासकाने २८० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार केलेल्या संबंधितांवर कारवाई करून रहिवाशांना तात्काळ भाडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) वर्तकनगर, ठाणे येथील म्हाडाच्या वसाहतीतील इमारत क्र.४५ व ४७ येथील आदर्श अपनाघर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील काही सभासदांनी ४५.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या सदनिकांच्या ऐवजी सोसायटी कमिटी आणि विकासक यांनी संगनमताने ३९.९५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या सदनिका देत असल्याची तक्रार म्हाडा कार्यालयास केली असून म्हाडाने इमारतीच्या पुनर्विकासास कोणत्याही प्रकारची संमती देवू नये, असे दिनांक २९/०५/२०२३ रोजी कळविले आहे.

(२) प्रस्तावित ठिकाणी एकत्रित पुनर्विकासाचा प्रस्ताव सन २०१५ मध्ये म्हाडा कार्यालयात सादर करण्यात आला होता.त्याबाबत म्हाडा कार्यालयाने छाननी करून काही अटी व शर्तींच्या अधिन राहून त्यास तत्वत: मंजुरी दिलेली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक ३०/०५/२०१८ रोजीच्या पत्रामध्ये सदर इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे नमूद केले आहे. तसेच विकासकाने उक्त भूखंडावर कर्ज घेतल्याची बाब व विकासकाने रहिवाशांना भाडे देणे बंद केल्याबाबत कोणतीही तक्रार म्हाडास प्राप्त झालेली नाही.

सदरहू इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता संस्थेने विकासकाची नेमणूक केली आहे. त्यानुसार संस्था व विकासक यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यानुसार पुनर्विकास केला जातो. त्यामुळे रहिवाशांना भाडे देणे हा विषय म्हाडाशी संबंधित नसून रहिवासी व विकासक यांच्याशी संबंधित आहे.

विकासकाची नेमणूक संस्थेने केली असल्याने संस्था न्यायालयामध्ये दाद मागू शकते. तसेच, करारनाम्यामधील तरतुदीनुसार घराचा ताबा मिळण्याबाबत उशीर होत असल्यास गुंतवणूकदार हे रेरा या सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागू शकतात.

तथापि, याबाबत मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिनांक १७/०७/२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) गिरण्यांच्या जमिनींवरील चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२८) * २०५६५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १८२४० ला दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) नऊ गिरण्यांच्या जमिनींवर असणाऱ्या ११ चाळींची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून बऱ्याचशा खोल्यांमध्ये गळती, स्लॅब कोसळणे याचे प्रमाण वाढल्याने भविष्यात जीवित आणि मालमत्ता हानी होण्याची शक्यता असल्याची बाब दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू चाळींच्या पुनर्विकासाची योजना राज्य शासनाने सादर करावी, केंद्र शासन त्याला तातडीने मंजुरी देईल, अशी घोषणा केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री महोदयांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी केली असून त्यानुषंगाने शासनाने योजना सादर केली आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या जागेवरील इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या समन्वयाने काय कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू चाळींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आणि याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), (३) व (४)

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीच्या मुंबई शहरात एकूण ११ गिरण्यांच्या जमिनी आहेत. त्यापैकी ०६ गिरण्यांच्या जमिनीवरील उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती ही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने वेळोवेळी केली आहे. १ गिरणीच्या जागेवरील इमारतीचे सन २००७ मध्ये तोडून नविन इमारतीचे बांधकाम झाले आहे.

मा.केंद्रीय मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीच्या मुंबई शहरातील बिगर उपकरप्राप्त गिरण्यांच्या जमिनीवरील इमारतींना उपकर लागू करणे व सदरहू इमारतींचे भूसंपादन करुन पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याबाबत तपासणी करण्याचे निदेशित केले आहे.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने राज्य शासनास केलेल्या विनंतीनुसार, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीच्या ४ गिरण्यांच्या जमिनीवरील बिगर उपकरप्राप्त इमारतींना उपकर लागू करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## दादर (मुंबई) येथील ‘इंफ्राटेक’ या विकासकावर आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कारवाई करणेबाबत

**(२९) * २०५२४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सनसाईन टॉवर, फुलमार्केट, दादर येथील ‘इंफ्राटेक’ या विकासकाने सन २०१८ पासून स्वस्त घरांचे आमिष दाखवून अनेक मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असल्याची बाब दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक गुंतवणूकदारांनी सदनिकांची नोंदणी रद्द केली असतानाही त्यांची गुंतवणूक परत करण्याबाबत विकासकाकडून अक्षम्य दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मध्यमवर्गीय नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासकावर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) सनसाईन टॉवर, फुलमार्केट, दादर येथील "इंफ्राटेक" या विकासकाने सदर प्रकल्प महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी केल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर विकासकाने खरेदीदारांची कोणतीही फसवणूक केल्याची तक्रार प्राप्त झाल्यास सदर विकासकावर नियमानुसार कारवाई करण्याची सुचना गृह विभाग, नगरविकास विभाग व संबंधित प्राधिकरणांना देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे राम मंदिरासमोर झालेल्या दंगलीची चौकशी करण्याबाबत

**(३०) * १९३०३ श्री.अंबादास दानवे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील किराडपुरा भागात राम मंदिरासमोर घोषणाबाजीवरुन दोन गटात झालेल्या वादाचे रुपांतर दंगलीत होऊन तणाव निर्माण होऊन पोलिसांच्या गोळीबारात एका नागरिकाचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे दंगलखोरांनी तुफान दगडफेक करुन १६ वाहने जाळली असून दगडफेकीत २० पोलीस जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी संबंधित घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने जातीय तणाव निर्माण करणाऱ्या संबंधितांवर तसेच उक्त घटनेकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) सदर प्रकरणी पोलीस ठाणे जिन्सी औरगांबाद येथे गु.र.क्र. ९३/२०२३ कलम ३०७,१२० (ब), ३५३, ३३२, ३३३, ३३६, ४३५, २९५, १४३, १४७, १४८, १४९, १५१, १५२, १५३ भा. दं. वी. सह कलम ३, ४ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सह कलम ७ फौजदारी कायदा सह कलम

१३५, १४० महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात एकूण ७७ आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना जामिन मंजूर केला आहे. तसेच ६७ आरोपींवर सी आर पी सी १०७/११० प्रमाणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सूरु आहे. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांचे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने अहवाल सादर करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमतंर्गत वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आल्याबाबत

**(३१)** * **१९०४० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागांतर्गत असलेल्या कोकण, पुणे, नागपूर व औरगांबाद या चारही परिक्षेत्रामध्ये दिनांक २४ ते २६ एप्रिल, २०२३ दरम्यान तीन दिवसीय विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली असता राज्यात अंदाजे साडेतीन कोटींची ३८३ वीजचोरांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ३८३ वीजचोरीच्या प्रकरणातील दोषींविरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, वीजचोरी प्रकरणास परिणामकारकरित्या आळा घालण्याबाबत नियमित कोणती कायमस्वरूपी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

महावितरण मधील सुरक्षा व अंमलबजावणी (सुवअं) विभागातर्गंत असलेल्या कोकण,पुणे,नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार परिक्षेत्रामध्ये दिनांक २४ ते दिनांक २६ एप्रिल, २०२३ दरम्यान तीन दिवसांची विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येवून त्यामध्ये एकूण ३९० ग्राहकांच्या २.२१ दशलक्ष युनिटसची ४ कोटी ५१ लाख रुपयांची वीज चोरी उघडकीस आणण्यात आली.

(२) वीज चोरी प्रकरणातील सर्व ग्राहकांना विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींनुसार वीज चोरीचे दंडात्मक देयक देण्यात आले असून, सदर देयकाचा भरणा केल्यास संबंधित वीज ग्राहक/वापरकर्ते यास वीज चोरीमुळे होणारी पोलीस कारवाई टाळण्याकरीता संधी देण्यात येऊन वीज चोरी प्रकरणामध्ये तडजोड रकमेचे देयक देण्यात येते. तडजोड रकमेचा भरणा न केल्यास अशा वीज वापरकर्त्या विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींनुसार पोलीस स्टेशनमध्ये वीज चोरीचा गुन्हा नोंदविण्यात येतो. दिनांक २४ ते दिनांक २६ एप्रिल, २०२३ दरम्यान उघडकीस आलेल्या वीज प्रकरणांपैकी २२१ प्रकरणांमध्ये दंडासह तडजोडीची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ८७ प्रकरणांमध्ये पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच ८२ प्रकरणांमध्ये भरारी पथकांव्दारे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दाखल करण्यात आलेल्या गुन्हयांमध्ये पोलीस विभागामार्फत तपास/चौकशी करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(३) वीज चोरी थाबविण्यासाठी महावितरणामार्फत वेगवेगळया पातळीवर वेळोवेळी विशेष तपासणी मोहीम राबवून वीज चोरांविरुध्द कारवाई करण्यात येते. महावितरणाव्दारे नव्याने विकसित Automated Theft Management System (ATMS), M-DAS इत्यादी आधुनिक माहिती तंत्रज्ञान प्रणालीचा वापर करण्यात येवून वीज चोरी उघडकीस आणण्यात येते. तसेच स्थानिक वृत्तपत्रामध्ये वीज चोरी न करणेबाबत आवाहन करण्यात येते. वीज चोरीची माहिती देणाऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी वाड्या व वस्त्यांमध्ये रस्ते व अन्य सुविधा नसल्याबाबत

**(३२)** * **२०५०७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगाव-कोळघर, ताडवागळे-कोळघर-वाघजई, बिडवागळे-कुर्डुस, सांबरी आंबेटी कोंझरवाडी, पळी-आंबेघर (ता.अलिबाग,जि.रायगड) या भागात मोठ्या प्रमाणावर आदिवासी वस्त्या/वाड्या असून या भागात दळणवळणाची सुविधा उपलब्ध झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी वाड्या/वस्त्यांमधील आदिवासी समाज पाणी, रस्ते, वीज आदी सुविधांपासून वंचित असल्याने या आदिवासी वाड्यांचा विकास प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी वाडा/वस्त्यांना दळणवळणाच्या दृष्टीने रस्ते, वीज, पाणी व इतर मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील श्रीगाव-कोळघर, ताडवागळे – कोळघर -वाघजई, विडवागळे-कुर्डुस, सांबरी आंबेटी कोंझरवाडी पळी-आंबेघर (ता.अलिबाग,जि.रायगड) ही गावे/वाड्या आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आहेत.

सांबरी गावातील चिंबरानवाडी, बिडवागळे गावातील कोंझरवाडी,कामतवाडी व खुंटगाण, रुईशेत गावातील गारभाट, धरणाचीवाडी या वाड्या वगळता सर्व गावे आठमाही व बारमाही रस्त्याने जोडलेले आहेत.

उपरोक्त गावांपैकी कुर्डुस गामपंचायत अंतर्गत बिडवागळे गावातील खुंटगाव (ठाकूरवाडी) व रुईशेत गावातील धरणाचीवाडी या वाड्या वगळता सर्व वाड्यांमध्ये विद्युत व्यवस्था उपलब्ध आहे.

ताडवागळे ग्रामपंचयत, कुर्डुस ग्रामपंचायत अंतर्गत बिडवागळे गावातील कामतवाडी व खुंटगाव या वाड्या वगळता सर्व वाड्यांमध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय

१) श्रीगाव मेढेखार नळ पाणीपुरवठा योजना

२) ताडवागळे नळ पाणीपुरवठा योजना

३) बोपोली वाघजई नळ पाणीपुरवठा योजना

४) कुर्डुस नळ पाणीपुरवठा योजना
५) कुरकुंडी कोलटेंभी नळ पाणीपुरवठा योजना या सर्व योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले असून सदर कामे प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## 'कोल्हापूर बंद' ला हिंसक वळण देऊन जातीय दंगली घडविणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) * २००२८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर आणि छायाचित्रे प्रसारित केल्याच्या निषेधार्थ दिनांक ७ जून, २०२३ रोजी पुकारलेल्या 'कोल्हापूर बंद' ला हिंसक वळण लागून शहरातील विविध भागात १३ ठिकाणी दगडफेक होऊन यात दुकाने, हातगाड्या व वाहनांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक ७ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या अडीच ते तीन महिन्यांत राज्यातील आठ शहरांमध्ये जातीय तणाव व हिंसाचाराचे प्रकार घडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या जातीय दंगली घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ७/०६/२०२३ रोजी कोल्हापूर शहरात पुकारलेल्या बंदच्या अनुषंगाने ३ ठिकाणी गुन्हे दाखल आहेत. लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे हद्दीत रुपये ५,१६,०००/- शाहुपूरी पोलीस ठाणे हद्दीत रुपये ६००००/- व जुना राजवाडा पोलीस ठाणे हद्दीत रुपये ३,०२,३००/- असे एकूण रुपये ८,७८,३००/- इतके सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे.
(२) राज्यातील कोल्हापूर शहर, औरगांबाद, अमरावती शहर, जळगाव व रायगड या ५ ठिकाणी जातीय तणाव व हिंसाचाराचे प्रकार घडलेले आहेत.
(३) अशा प्रकारच्या जातीय दंगली घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने उपरोक्त ५ शहरांतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये भादंवि व इतर फौजदारी कायद्यांन्वये ११ F.I.R. दाखल झाल्या आहेत. तसेच यामध्ये २२७ (८ विधीसंघर्षित बालकांसहित) आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींवर फौ. प्र. सं. १९७३ कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) मध्ये उच्च दाब विदयुत वाहिनीच्या संपर्कात आल्याने कंटेनर चालकाचा मृत्यू झाल्याबाबत.

**(३४) * २०७९५ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथे रस्ता रुंदीकरणानंतर उंच झालेला रस्ता आणि रस्त्यावरून जाणाऱ्या वीज वाहिन्यांमधील अंतर कमी झाल्याने उच्च दाब विदयुत वाहिनीच्या संपर्कात आल्याने कंटेनर चालकाचा मृत्यू झाल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारीच्या प्रशासकीय यंत्रणेच्या समन्वयाअभावी तसेच दुर्लक्ष केल्यामुळे निष्पाप जीवांचे बळी जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपघातानंतर रस्त्यावरील वीज वाहिन्या आणि रस्त्यामधील अंतर वाढवण्यासाठीची सर्व कामे पूर्ण करण्यासंदर्भात महावितरण सातत्याने मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारीकडे पाठपुरावा करीत असूनही माहे फेब्रुवारी, २०२० पासून मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारीकडून ही कामे प्रलंबित असल्याचे महावितरणाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कामे प्रलंबित ठेवणारे अधिकारी /कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन मृत्यू पावलेल्या चालकाच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

कल्याण बदलापूर रोड, अंबरनाथ येथे दिनांक २६/०५/२०२३ रोजी पहाटे ४.३० च्या सुमारास एक मालवाहू कंटेनर महावितरणच्या २२ के.व्ही.विद्युत वाहिनीच्या संपर्कात आल्याने कंटेनर वाहनचालकाचा प्राणांतिक अपघात झाला.

(२) कल्याण बदलापूर रस्त्याचे रुंदीकरणाचे व कॉक्रिटीकरण करण्याचे काम मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारी (एमएमआरडीए) यांच्याव्दारे करण्यात येत आहे. परंतु एमएमआरडीएने उच्चदाब वाहिनीची उंची वाढविण्याबाबतची काही कामे केली नसल्यामुळे सदरची कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता महावितरणतकडून एमएमआरडीएकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे,

कल्याण बदलापूर रस्त्याचे रुंदीकरणाचे व कॉक्रिटीकरण करण्याचे काम मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारी (MMRDA) यांच्याव्दारे करण्यात येत असून, सदर कामामुळे महावितरण कंपनीची २२ के.व्ही.उच्चदाब/लघुदाब उपरी मार्ग वाहिन्या व बनवलेला रस्ता यातील उंची कमी झाली आहे. ही उंची धोकादायक पातळीची असल्याने कोणत्याही प्रकारचे अपघात टाळण्यासाठी महावितरणच्या उपरी तार मार्ग वाहिन्यांच्या खांबांची उंची वाढविण्याबाबत मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकारी (MMRDA) कार्यालयास महावितरणच्या विभागीय कार्यालयाव्दारा सन २०२० पासून वेळोवेळी पत्र व ई-मेल व्दारे पाठपुरावा करण्यात आला आहे.

(४) महावितरणकडून सदर रस्त्यावरील उच्चदाब / लघुदाब वाहिनीची उंची वाढविणे व रोहित्रे स्थलांतरित करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक CE/KLNZ/ TECH / DDF Sanction/१७६, दिनांक १६/०१/२०२० नुसार रुपये ७,९०,७४,९०६/- एमएमआरडीएला देण्यात आले होते. सदर कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता महावितरणतर्फे एमएमआरडीएकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

मयत वाहनचालक यांच्या प्राणांतिक विद्युत अपघात प्रकरणी महावितरण कंपनीच्या नियमानुसार रुपये ४,००,०००/- इतकी नुकसानभरपाई कल्याण मंडळ-२,कार्यालयामार्फत दिनांक १०/०७/२०२३ रोजी मंजूर करण्यात आली आहे.

तथापि, मयत वाहनचालक हे इतर राज्यातील असल्यामुळे त्यांच्या वारसदारांशी संपर्क साधण्यात येत असून संपर्कानंतर नुकसानभरपाई रक्कम संबंधितास अदा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देहरजी मध्यम प्रकल्पातून (ता.विक्रमगड, जि.पालघर) पालघर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांकरिता पाण्याचा साठा राखीव ठेवण्याबाबत

**(३५) * २०८१२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहरजी (ता.विक्रमगड,जि.पालघर) मध्यम प्रकल्पास सन १९७९ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळून सदर प्रकल्प हा आदिवासी भागाच्या सिंचनासाठी राखीव ठेवण्यात आला असून सदर प्रकल्पातून वसई – विरार शहर महानगरपालिकेला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन शासनाने केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील विक्रमगड, पालघर, वाडा तालुक्यांतील टंचाईग्रस्त गावांना देहरजी मध्यम प्रकल्पातून पाणी देण्याचे कोणतेही नियोजन शासनाने केले नसल्याने गावातील ग्रामस्थांमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे पुनर्वसित होणाऱ्या साखरे, खुडेद, जांभे येथील बाधित कुटुंबांना पर्यायी जमीन व अन्य मोबदला देण्यात आला आहे काय, तसेच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील देहरजी मध्यम प्रकल्पातून विक्रमगड, पालघर, वाडा तालुक्यांतील टंचाईग्रस्त गावांकरिता पाण्याचा साठा राखीव ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकल्प बाधितांना पुनर्वसित करुन त्याचा मोबदला देणेसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

देहरजी मध्यम प्रकल्पास शासन निर्णय दिनांक ०४/०५/१९७९ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सदर प्रकल्प हा सिंचन प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार होता. तद्नंतर शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये देहरजी मध्यम प्रकल्प ता.विक्रमगड जि.पालघर या प्रकल्पातून

वसई-विरार शहर महानगरपालिकेस पिण्यासाठी पाणी आरक्षित करून पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून राबविण्यात येत आहे.

(२) लोकप्रतिनिधी व स्थानिक ग्रामस्थ यांनी वेळोवेळी स्थानिक ग्रामस्थांना पाणी उपलब्ध होणेकरीता केलेल्या मागणीनुसार धरणाच्या खालील बाजूस अनुक्रमे शेवते, आंबेघर-नागझरी, मान, हातने (कोसबाड), सावरोली व केव येथे ६ को.प.बंधाऱ्यांचा मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात समावेश करण्यात आला आहे, तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार स्थानिक ग्रामस्थांना पाणी उपलब्ध होणेकरीता केलेल्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार धरणाच्या वरील बाजूस देहरजी नदीवर ३ बंधारे बांधण्याबाबत सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना पाणी उपलब्ध होणार आहे.

(३) देहरजी मध्यम प्रकल्पाकरीता आवश्यक खाजगी जमिनीचे भूसंपादन प्रक्रियेकरीता आवश्यक निधी भूसंपादन अधिकारी उपविभागीय अधिकारी, उपविभाग वाडा यांना वितरीत करण्यात आला आहे.

देहरजी मध्यम प्रकल्पाकरीता भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ४५ प्रमाणे प्रकल्प स्तरावरील पुनर्वसन व पुनर्वसाहत समिती स्थापना मा.जिल्हाधिकारी पालघर यांचे आदेश दिनांक २३/१२/२०२२ अन्वये करण्यात आली आहे. सदर प्रकल्पस्तरावरील समितीच्या दिनांक ३१/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीतील सूचनेनुसार अंशतः बाधित मौजे साखरे व खुडेद या गावठाणालगत पुनर्वसनाकरीता पर्यायी जागांची प्राथमिक पाहणी करून त्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वाडा उपविभाग वाडा यांचे पत्र दिनांक २८/०६/२०२३ अन्वये मा.उपजिल्हाधिकारी पालघर, पुनर्वसन शाखा यांना सादर करण्यात आला आहे.

(४) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील देहरजी मध्यम प्रकल्पातून विक्रमगड, तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना पाण्याचा साठा उपलब्ध करणेकरीता धरणाच्या खालील बाजूस अनुक्रमे शेवते, आंबेघर-नागझरी, मान, हातने (कोसबाड), सावरोली व केव येथे ६ को.प.बंधाऱ्यांचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दिनांक १४/०९/२०२१ मध्ये समावेश करण्यात आलेला असून प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन प्रक्रिया प्रगतीपथावर असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये प्रकल्प बाधितांचे भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रिया उपविभागीय अधिकारी उपविभाग वाडा यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## शहापूर (जि, ठाणे) तसेच पालघर येथील आदिवासी विकास महामंडळाने कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(३६) * २०८२२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तसेच पालघर येथील आदिवासी विकास महामंडळाने सन २०२२ -२०२३ मध्ये खरेदी केलेल्या भात, बारदान व सुतळ खरेदीत कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब व्यवस्थापकीय संचालिका आदिवासी विकास महामंडळ यांनी दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास केलेल्या गोदामांच्या तपासणीत निदर्शनास आली असून यात चार अधिकाऱ्यांना निलंबित केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) व पालघर येथील आदिवासी विकास महामंडळात भ्रष्टाचार झाल्याचे पालघर काँग्रेस कमिटीतर्फे पालघर जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र देऊन चौकशीची मागणी केली असूनही याबाबत पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कारकीर्दीत केलेल्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पालघर काँग्रेस कमिटीने दिलेले निवेदन जिल्हाधिकारी, पालघर यांचे मार्फत पुढील कार्यवाहीस्तव आदिवासी विकास महामंडळास पाठविण्यात आले होते. या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन आदिवासी विकास महामंडळाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांचे वर तसेच आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, पळशीन या संस्थेचे तीन पदाधिकारी यांचे वर पोलीस स्टेशन शहापूर, ता.शहापूर, जि.ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.